# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.09.2024** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं उद्या पुणे मेट्रोच्या भुयारी मार्गाचं लोकार्पण
2. रत्नागिरी जिल्ह्यातल्या कर्दे गावाला केंद्रीय पर्यटन मंत्रालयाचा कृषी पर्यटनासाठीचा पुरस्कार जाहीर
3. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाची मुंबईत राजकीय पक्ष आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा आणि
4. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री रोहिदास पाटील यांचं निधन

**<u>मेट्रो उद्घाटन</u>**

पुण्यातील शिवाजीनगर जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या भुयारीमेट्रो मार्गाचं लोकार्पण उद्या दुपारी साधारण 12 वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं होणार आहे. केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पत्रकार परिषदेमध्ये ही माहिती दिली. यावेळी बोलताना मोहोळ म्हणाले..

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार पुण्यात प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत. या लोकार्पण सोहळ्यानंतर स्वारगेट इथल्या गणेश कला क्रीडा मंच इथ जाहीर सभा होणार असल्याचंही मोहोळ यांनी सांगितलं.

**<u>मन की बात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 114 वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून सकाळी अकरा वाजता हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल.

**<u>पर्यटन दिन-रत्नागिरी, सिंधुदुर्ग</u>**

जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी पर्यटन महत्त्वाची भूमिका बजावत असून, मानवतेचे बंध निर्माण करण्याचं काम पर्यटनाच्या माध्यमातून होतं, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. जागतिक पर्यटन दिनानिमित्त केंद्रीय पर्यटन मंत्रालयानं नवी दिल्लीत आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते काल बोलत होते. केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, पर्यटन राज्य मंत्री सुरेश गोपी यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. पर्यटन मंत्रालयातर्फे दिले जाणारे उत्कृष्ट पर्यटन ग्राम पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात आले. विविध आठ श्रेणींमध्ये 36 गावांना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत. यात कृषी पर्यटनासाठीचा पुरस्कार रत्नागिरी जिल्ह्यातल्या कर्दे गावाला मिळाला. देश पातळीरील ही स्पर्धा दूरस्थ पद्धतीनं घेण्यात आली; त्यामध्ये गावातल्या उपक्रमांसंदर्भातलं सादरीकरण कर्दे गावाचे सरपंच सचिन तोडणकर यांनी केलं होतं. हा पुरस्कार संपूर्ण कोकणातल्या कृषी पर्यटनाचं प्रतिनिधित्व करतो, अशी भावना त्यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली; याविषयी बोलताना तोडणकर म्हणाले.......

**पर्यटन**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त पर्यटन विभागानं 'पर्यटन मित्र' आणि 'पर्यटन दीदी' हे दोन नवीन उपक्रम सुरु केले आहेत. या उपक्रमात पर्यटक स्नेही मार्गदर्शक तयार करण्यासाठी महिला आणि युवकांना प्रशिक्षण दिलं जाईल. राज्यातही पर्यटन दिनानिमित्त अनेक उपक्रम झाले. वेरुळ इथल्या राष्ट्रकूट पर्यटक निवासाचं उद्घाटन काल राज्याचे पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी मुंबईतून दूरस्थ पद्धतीनं केलं. वेरूळ लेणी परिसरात दोन दिवसांच्या चित्र प्रदर्शनाचं आयोजनही करण्यात आलं आहे. हे प्रदर्शन आज संध्याकाळ पर्यंत सर्वांसाठी खुलं राहणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटन दिनाचं औचित्य साधून स्वदेश दर्शन 2.0 या उपक्रमांतर्गत जिल्ह्यासाठी तयार करण्यात आलेल्या एक विशेष बोधचिन्हाचं अनावरण पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते काल करण्यात आलं.

**निवडणूक आयोग**

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगानं काल मुंबईत विविध बैठका घेतल्या. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासह निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी काल राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरच्या पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक घेतली. त्यानंतर राज्यातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी निवडणूक आयोगानं चर्चा केली. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह खात्याचे अतिरीक्त मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यानंतर निवडणूक आयोगानं कोकण आणि पुण्याचे विभागीय आयुक्त, कोकण परिक्षेत्राचे महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक यांच्याबरोबर निवडणूक तयारीचा आढावा घेतला. महाराष्ट्र आणि इतर राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांच्या प्रलंबित बदल्या करण्यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगानं काल राज्याच्या मुख्य सचिवांना पत्राद्वारे निर्देश दिले. यासंदर्भात संबंधित विभागांचे आणि कार्यालयांचे अनुपालन अहवाल तत्काळ सादर करण्याच्या सूचना आयोगानं दिल्या आहेत.

**निधन-धुळे**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री रोहिदास पाटील यांचं काल धुळे इथं वार्धक्यानं निधन झालं. ते 84 वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज अंत्यसंस्कार करण्यात येतील. रोहिदास पाटील यांनी धुळे जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली; त्यानंतर 1980 मध्ये ते तत्कालीन कुसुंबा आणि आताच्या धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघात आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर सलग सहावेळा त्यांनी या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं. विविध खात्यांचं मंत्रीपद त्यांनी भूषवलं. रोहीदास पाटील यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते शरद पवार, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**हवामान**

उत्तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.